# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

India's National Spiritual Newspaper

₹ 10/-

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXV | MAY 2023 | No. 04


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

**गीतशास्त्र : ३२ : १-८**

१) ज्याच्या अपराधांची क्षमा झाली आहे, ज्याच्या पापावर पांघरुण घातले आहे; तो धन्य!

२) ज्याच्या हिशेबी परमेश्वर अधर्माचा दोष लावीत नाही व ज्याच्या मनात कपट नाही; तो मनुष्य धन्य!

३) मी गप्प राहिलो होतो, तेव्हा सतत कण्हण्यामुळे माझी हाडे जीर्ण झाली;

४) कारण रात्रंदिवस तुझ्या हाताचा भार मजवर होता; उन्हाळ्याच्या तापाने माझ्यातले पाणी सुकून गेले.

५) मी आपले पाप तुजजवळ कबूल केले; आपले अपराध परमेश्वराजवळ कबूल करीन असे मी म्हणालो, तेव्हां तू मला माझ्या पापदोषाची क्षमा केली.

६) यास्तव तूं पावशील त्यावेळी प्रत्येक भक्ताने तुझी प्रार्थना करावी; जलांचा महापूर आला तरी त्याला त्याचा स्पर्श होणार नाही.

७) तू माझे आश्रयस्थान आहेस; तूं संकटापासून माझे रक्षण करिशील; मुक्ततेच्या स्तोत्रांनी तू मला वेढिशील

८) मी तुला बोध करीन; ज्या मार्गाने तुला गेले पाहिजे त्याचे शिक्षण तुला देईन, मी आपली दृष्टि तुजवर ठेवून तुला बुद्धिवाद सांगेन

# प्रभात होण्याची वेळ

## AT THE BREAK OF DAWN!

(सिस्टर अन्जेलीना सेल्वाकुमारी)



आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा "**त्याच्या बोलाविण्याच्या प्रतिध्वनी**" मासिका द्वारे तुम्हा सर्वांना भेटण्यास आनंद वाटत आहे. ज्याने आपणास आज पर्यंत चालविले आणि यापुढे देखील आपल्याला सर्व प्रसंगातून पार नेणार त्याची विश्वासनियता महान आहे.

"**त्याच्या ठायी देव आहे; ते ढळावयाचे नाही, प्रभात होतांच देव त्याचे सहाय्य करील.**" (स्तोत्र ४६:५)

हे अतिशय सुंदर असे अभिवचन आहे. कोणत्या परिस्थितीत ते दिले गेले आहे ते महत्वाचे किंवा सार्थ आहे. स्तोत्र ४६.२-३ या वचनात म्हटले आहे -

१) पृथ्वी उलथीपालथी झाली.
२) पर्वत सागरतळी बुडाले
३) त्याच्या लाटा गर्जून उसळल्या
४) पर्वत हालले

अशा प्रकारे सर्व सरकत, हालत आणि अस्वस्थ अशा स्थितीत असताना बायबल

(...पान ३ वर)




एको ऑफ हिज कॉल पाच मिनिटांचा संदेश

यू ट्युब ख्रिश्चन चॅनल

पास्टर सॅम सेल्वा राज

यांच्या सोबत प्रार्थनेत सहभागी होण्याची संधी

इंग्रजी, हिन्दी, तमिळ आणि तेलगु

प्रतिदिनी - पहाटे पाच वाजता  रविवारची तमिळ भक्ति - ८.३० सकाळी

ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



# तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...

REACHING NATIONS



## आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.


CHIEF EDITOR
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

MANAGING EDITOR
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

ADMINISTRATION
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

EDITORIAL BOARD
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

EDITOR, PUBLISHER & PRINTER
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

CORE LEADERS
Bro. K. Puratchivendan
Dr. Rabinder Boaz, M.S.
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

E.mail ID
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

WEBSITES
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

YOUTUBE CHANNEL
Echo of His Call


**"...परमेश्वरावर भव ठेवणाऱ्यां भोवती दयेचे वेष्टन असते..." (स्तोत्र ३२ : १०)**

प्रिय बंधुंनो आणि बहिणींनो,

आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या मधुर नामात तुम्हा सर्वांना शुभेच्छा.

आमच्या सेवाकार्यातील सर्व विभागांवर देव अतिशय चांगला राहिला आहे. मे महिन्यात उन्हाळ्याच्या सुट्टी निमित्ताने सर्व शैक्षणीक संस्था बंद राहतील. तेव्हा या दिवसांचा उपयोग स्थानिक मंडळीच्या सुवार्ता कार्यात सहभागी होऊन देवराज्याच्या वाढीकरिता करुया.

जगाकडे आपण दृष्टि टाकतो तेव्हा आम्हाला तरुण मुले/मुली उपासना आणि सेवाकार्यामध्ये सहभागी न होण्यामुळे देवापासून दूर जात असलेली पहावयास मिळत आहेत. ही अवस्था जगभरात सर्वत्र पहावयास मिळते. पाळक आणि मंडळीचे प्रशासन यामध्ये विशेष असे काही करु शकत नाही.

त्यामुळे संधीचा लाभ घेऊन जगीक लोक; राजकारणी आणि स्वत:स देवाचे सेवक म्हणविणारे, जे अयोग्य किंवा चुकीच्या सिद्धांत शिकवितात अशा व्यक्ति या तरुणांना हाताशी धरितात आणि या जगातील चुकीच्या मार्गाचे प्रशिक्षण देतात मंडळ्यांमधील उपासनांमधील तरुण-तरुणींची उपस्थिती कमी कमी होत चालली आहे. हि अतिशय वेदनादायक बाब आहे. कुटुंबातील वरीष्ठ व्यक्ति जरी त्यांना देवाच्या छत्राखाली ठेवण्याचा प्रयत्न करीतात, तरी देखील ते देवाच्या मार्गाकडे दुर्लक्ष्य करीतात.

आता, हि ख्रिस्ती पालक आणि पुढाऱ्यांसाठी अतिशय आग्रहाने प्रार्थना करण्याची - कि त्याने जगरभातील तरुण-तरुणांमध्ये संजीवन घडवून आणावे. आम्ही असे ओझे असणाऱ्या देवाच्या लोकांचा छोटासा गट तयार केला आहे जे त्याकरीता प्रार्थना करीत आहे. तुम्ही प्रार्थनेची गरज असलेल्या तरुण-तरुणींची नावे आमच्याकडे पाठवावित म्हणजे आम्ही त्यांच्यासाठी दयेच्या राजासनासमोर प्रार्थना करु. **तुम्ही त्याकरीता पैसे पाठविण्याची गरज नाही.** उलट तुम्ही आमच्यासह या **तरुण आणि किशोर वयीन लेकरांच्या जागतिक काळजी करीता प्रार्थनेत सहभागी व्हावे.** या संदर्भात आम्ही तुमच्या सुचनां अपेक्षीत आहोत.

याची सुरुवात म्हणून आम्ही जगभरातील सर्व लेकरांकरिता प्रार्थना करण्यांकरिता रात्री १०ची वेळ ठरविली आहे. तुम्ही तुमच्या देशाच्या समयानुसार प्रार्थना करावी.

आम्हाला ठाऊक आहे, की देवाचे लोक एकमनाने एका विशिष्ठ बाबीकरीता एकत्र येऊन प्रार्थना करीतात तेव्हा देव स्वर्गीय पिता उत्तर देतो. अशा लेकरांच्या आणि तरुणांच्या साक्षी तुमच्याकडे असतील, तर त्या आमच्याकडे पाठवा. प्रसिद्ध करण्या योग्य अशा साक्षी आम्ही प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करु.

तुमच्याकरिता आम्ही प्रार्थना करीत आहोत. आम्ही सर्व जगातील राष्ट्रांना सर्व प्रकारे गौरवी सुवर्ता गाजविण्याचा मन:पूर्वक परिश्रम करीत आहोत. कृपया आमच्या सह प्रार्थनेत सहभागी व्हा. देव तुम्हाल आशीर्वाद देवो.

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**


**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**

(+91) 98412 71858 / 98410 71858, E.mail : samselvaraj333@gmail.com


Our Ministries: ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Media Ministry Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

(पान १ वरुन... )

सांगत आहे. देव या सर्वांमध्ये आहे! आपल्या सभोवताली सर्व काही फिरत असताना - अस्वस्थ असताना, आपण हालणार नाही - स्थिर असणार. देव सर्व हालचालीत, वादळात आहे. तो आम्हास पहाट उगवताच सहाय्य पुरविल. कारण तो चांगला आहे! तो सर्व अशक्यतांचा देव आहे.

तुम्ही ज्या सर्व गोष्टिंमध्ये धडपडत अहात, लढत आहात, ज्या सर्व प्रार्थनांची अद्याप उत्तरे मिळावयाची आहेत, ज्या गोष्टींनी तुम्ही बांधले गेले आहात, ज्या परिस्थितीने तुम्हाला मर्यादित ठेविले आहे, ते सर्व ख्रिस्त येशूच्या नामामध्ये जोडले जाईल. "**प्रभात होताच देव आपले साहाय्य करील.**" (स्तोत्र ४६:५)

## I प्रभातीचे महत्व काय आहे?

### १) प्रभात एका नवन समयाची सुरुवात आहे!

यहूदि दिनदर्शीके नुसार अंधकार रात्री ९ ते १० पर्यंत पसरतो, त्यानंतर प्रभात समयास सुरुवात होते. तो सर्वसाधारणत: रात्री १२ ते पहाटे ३ पर्यंतचा समय असतो. तो अंधकार नाहीसा करून प्रकाश आणतो. - एक नवीन दिवस - एक नवीन सुरुवात वादळ, उलथापालथ, गर्जना या सर्व समयांतून जाण्याची गरज कां आहे?

### २) प्रभात एक स्थित्यंतर - अवस्थान्तर आहे.

प्रभात ही रात्र आणि दिवस या दोहोंमधील स्थित्यंतर आहे. ती एक ऋतुतून दुसऱ्या ऋतुत, एका समयातून दुसऱ्या समयातील स्थित्यंतर आहे. स्थित्यंतर समयच अनिश्चिततेचा आहे, ज्यामध्ये व्यक्तिला पुढचे पाऊल टाकण्याची शास्वस्ती नाही. या मार्गानी जावे कि, त्या दुसऱ्या मार्गाने जावे? ती गोंधळाचा आणि गैरसमजाची वेळ आहे. व्यक्ति निर्णय घेण्याकरिता धडपडत असते. ती भिती देखील प्रदर्शीत करते - काय घडणार आहे - काय घडणार आहे याविषयीची भीति. तुम्हाला ठाऊक आहे कां, कि हे जग आणि सैतान तुम्हाला या स्थित्यंतराच्या समयाकडे गोंधळ, गैरसमज, अनिश्चीतता अशा रितीने पहावयास लावतो. असे असले तरी, देव इच्छितो कि आपण या समयाकडे एक क्षण थांबण्याचा अशा दृष्टिने पहावे. Breakthrough या इंग्रजी शब्दाचा अर्थ - कशाकरिता तरी श्वास घेणे. देव या समयाकडे श्वास घेण्याचा काळ अशा अर्थाने पाहात आहे. जेथे तुम्ही तुटता किंवा मोडले जाता व बाहेर पडता.

मंडळी, कुटुंब आणि वैयक्तिक रित्या, आपण सर्व एका पुढच्या स्तराकडे जात असताना आपल्याला एक वाढीचा प्रोढत्वाचा एका नवीन स्थित्यंतर होत असलेले जाणवते. अंधाराचे दूर होणे म्हणजेच पहाटेचा उगम.

### ३) पहाट होणे हा आत्मिक युद्धाचा समय!

स्थित्यंतर हि सहज सोपी बाब नाही. ती मोडून-तुटुन बाहेर येणे आहे. ते एक प्रकारचे युद्ध, धडपड आहे! तुम्ही अंधारातून बाहेर येता. ते प्रयत्न न करीता प्रकाश आणीत नाही. देव आम्हाला अशा स्थित्यंतराच्या समयात बोलवित आहे. त्याने आम्ही आमच्या लेकरांमध्ये, कुटुंबामध्ये, आमच्या मंडळीसाठी, शहरासाठी, देशासाठी, जगासाठी स्थित्यंतर घडवून आणण्याकरिता नेमिले आहे. हा आत्मिक स्थित्यंतराचा समय आहे!!!

आम्हाला अंधकारमय आणि अशक्यप्राय अशा गोष्टि दिसतील परंतु त्या

# जागतिक तरुण/तरुणींच्या आणि लहान लेकरांच्या कल्याणाचे उद्दीष्ट

## GLOBAL VISION FOR YOUTH & KID CARE

देवाने आम्हाला सर्व देशांतील लहान लेकरें आणि तरुण-तरुणी यांच्या कल्याण्यकरिता प्रार्थना करण्याचे त्याना शिक्षण देण्याचे आणि त्यांना देव राज्याकरिता सुसज्ज करण्या विषयीचे आणि विशेष लक्ष पुरविण्या विषयीचे ओझे दिले आहे.

आम्ही ज्यांना हे ओझे आहे अशा जगभरातील देवाच्या लोकांचा एक छोटासा गट तयार केला आहे आणि त्या गटाने दररोज रात्री १० वाजता (त्यांच्या देशाच्या वेळेनुसार) एका मनाने प्रार्थना करण्यास सुरुवात केली आहे. या गटात सामील



होण्यास तुमचे स्वागत आहे. तुमच्या सहभागा बद्दलची इच्छा आम्हाला कळवा. आम्ही तुम्हाला उत्तर देवू.

आणखीन, जर तुम्हांला तुमच्या लेकरांच्या, नातवंडांच्या आत्मिक कल्याणाविषयीची काळजी आहे, तर आम्हाला त्यांच्या वयासहित व गरजांसहित त्यांची नांवे पाठवा. तुम्ही जर वय वर्षे ३५च्या आंत आहात, तर तुम्ही स्वत: तुमचे नांव नोंदवू शकता. याकरिता कृपया पैसे पाठवू नका. देव तुम्हाला आशीर्वाद देवो.

आमचा संपर्क तपशील :
**GLOBAL VISION FOR YOUTH & KID CARE**
**Echo of His Call**
Mobile & WhatsApp No : +91- 98412 71858 &
+91- 98410 71858
E.mail ID : sam@echoofhiscall.org

आमच्या स्थित्यंतराकरीत साधन आहेत. एलीया शरिराने, मनाने, आत्मिक आणि भावनिक रितीने गळून गेलेल्या स्थितित बसला होता. त्याला जगणें अशक्य वाटत होते. त्यांच्या जीवनातील तो एक अंधकारमय असा क्षण होता. बालाच्या पुजाऱ्यांच्या विरोधातील एकट्याने लढा दिल्या नंतर, त्याला एकच आवाज ऐकू येत होता की तो मारला जाणार आहे. तो अतिशय घाबरुन गेला होता. इतका कि त्याला सरळ विचार करिता येत नव्हता. तो म्हणाला, ''**...हे परमेश्वरा, आता पुरें झाले, माझा अंत कर; मी आपल्या वाडवडिलांहून काही चांगला नाही.**'' (१ले राजे १९.४)

त्याला वाटते आता सर्व संपले आहे आणि सर्वत्र अंधकार आहे; त्याला थोडीशी तरी जाणीव झाली असती कि हा समय स्थित्यंतराचा - बदल घडण्याचा, आणि **त्या दोहोमधील समय आहे!** त्यांने अंधार-काळोख पाहिला परंतु पहाट पाहिली नाही. देवाने त्याला अंधार - काळोख मोडून काढण्यास ठेविले होते. या वर्षी देव आपणापैकी काही जणांना स्थित्यंतराच्या समयात या अवस्थेत ठेवीत आहे, या साठी की आपण अंधार मोडीत काढून - नष्ट करून प्रकाश आणावा. मोठ्याने बोला - आमेन!!!

''**फोडतोड करणारा त्यांच्यापुढे चालला आहे.**'' - मीखा २:१३ आमेन. तो आपल्यापुढे अंधार दूर करण्यास चालेल आणि आपणांस प्रकाशात आणील. ''**... ते फोडून वेशींतून पार निघून गेले,...**'' (मीखा २:१३) आमेन.

तुम्हाला ज्या कशाने रोखून ठेविले आहे, अंधारात ठेविले आहे, चूर-चूर केले आहे, मर्यादा घातली अशा सर्व स्थितितून देव तुम्हाला त्यामधून बाहेर जाऊ देत आहे, येशूच्या नामामध्ये, ''तुम्ही त्या मधून बाहेर याल.'' कारण तो तुमच्या पुढे चालत आहे. **प्रतापशाली राजा आंत येईल, बलवान व पराक्रमी परमेश्वर, युद्धात पराक्रमी परमेश्वर तोच**'' (स्तोत्र २४:७-९) जसे प्रसिद्ध गीतात म्हटले आहे -

***''मला ठाऊक आहे माझ्या पुढे कोण जात आहे,***
***मला ठाऊक आहे माझ्या पाठीमागे कोण आहे,***
***देवाच्या दुवांची सेना माझ्या बाजूने आहे...***
***मजविरुद्ध योजिलेले टिकणार नाही...''***

मी भीणार नाही कारण, प्रभु मजबरोबर आहे. अगोदर सांगितल्या नुसार स्थित्यन्तर म्हणजे अंधारातून बाहेर पडून प्रकाशात येणे. या वर्षी देव आपणांस अंधारातून बाहेर काढील. अशासाठी की आपण विजयाने प्रकाशात प्रवेश करावा.

## II कशामधून स्थित्यंन्तर

अंधकार - अंधकार कशाचे प्रतिक आहे!

### अ) दुष्ट सत्ता :-

जे सर्व निर्दयी - अघोर किंवा दुष्ट ते म्हणजे अंधकार. तो सैतान जो अंधकाराच्या सत्तेचा अधीपती. त्याचे प्रतिक आहे अंधकार ही सत्ता आहे. कलस्से १:१३ वचनात असे म्हटले आहे, ''**त्याने आपल्याला अंधकाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यांत आणून ठेविले.**'' सत्ता ही अधिकार गाजविते. आपल्यापैकी काही जणांना असे वाटते की, माझ्या जीवनात कोणीतरी आहे जो अधिकाराने शब्द उच्चारावयास लावतो किंवा एक कळ दाबतो आणि मला त्याबद्दल काही करता येत नाही. पहाट ही अंधकाराची सत्ता मोडून काढीत आहे.

जे काही पापीष्ठ आहे. त्याचा अर्थ देखील अंधकार होतो; जो अधिकार गाजवितो, जो दडपशाही करतो, जो आपल्या वर नियंत्रण करीतो. कदाचित तुम्ही एकाद्या सवईच्या नियंत्रणात आहात आणि तीमधून बाहेर पडण्यासाठी धडपड करीत आहात. तुम्हाला हे माहीत आहे कां? की प्रौढ-परिपक्व ख्रिस्ती व्यक्ति देखील पापाच्या बंधनातून बाहेर पडण्यासाठी धडपड करीत आहेत! अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे, प्रत्येकाला अगदी तळहातावरून इंटरनेटकडे जाता येते. तर्क करा ओळखा पाहू! त्यामुळे पापासाठी पुष्कळसे मार्ग खुले केले आहेत, ज्याची आपण कल्पना देखील करु शकलो नाही. समाज माध्यमाच्या सवईत गुंतले जाणे, टिक् टॉक् मध्ये वेळ व्यर्थ खर्च करणे आणि यू-ट्युबमधील दृष्ये पाहाणे, अश्लील चित्र पहाणे (वयाची मर्यादा न राखता) अतिशय खेदाची बाब

(...पान ६ वर)


# नहेम्याह बाइबल कॉलेज
## रेसिडेन्शल कॉलेज, चेन्नई।

माध्यम: हिन्दी

*सदस्यता के लिए पंजीकृत उम्मीदवार* - ATA

ATA
NEHEMIAH BIBLE COLLEGE
CHENNAI
Regd. Candidate for Membership
ECHO OF HIS CALL ★ Estd. 1969

ECHO OF HIS CALL
REACHING NATIONS

सुविख्यात अंतर्राष्ट्रीय मसीही अगुवे तथा पिछले 53 वर्षों से सेवारत वरिष्ठ पासवान

सर्टिफिकेट इन थियोलॉजी – 1 साल
डिप्लोमा ऑफ थियोलॉजी – 2 साल

योग्यता 10 वी या अधिक
जल्दी करें!

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
★ ऑनलाइन कक्षाएं उपलब्ध हैं ★

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ मे २०२३ ते १८ जून २०२३ पर्यंत

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

| | |
|---|---|
| १९ मे | :आमच्या मुद्रणालयावरील आणि मिशन क्षेत्रांत पाठविण्यात येत असलेल्या १६ भाषांमधील प्रकाशनांवर असलेल्या देवाच्या आशीर्वादा बद्दल. |
| २० मे | :आमचा सेवाकार्यासाठी केलेला प्रवास आशीर्वादीत केल्या बद्दल. |
| २१ मे | :आमच्या मुख्य आणि सर्व शाखा मंडळ्यांना देवाने आशीर्वादीत केल्या बद्दल. |
| २२ मे | : आपला प्रभु परमेश्वराने सर्व प्रकारच्या दुष्ट शक्तिपासून आमचे वरिष्ठ पाळक पास्टर एस्. सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना सुरक्षित ठेविल्या बद्दल. |
| २३ मे | : आमच्या **बायबलकोर** आणि **थियॉलॉजीकल टपालाद्वारे अभ्यासक्रमा** वरील देवाच्या आशीर्वादा बद्दल. |
| २४ मे | : **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** करीता नवीन आध्यापक दिल्या बद्दल. |
| २५ मे | :आमच्या मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळीतील रविवारच्या उपासने बद्दल. |
| २६ मे | : **नहेम्या बायबल कॉलेज** करिता नवीन प्राध्यापक देऊन आशीर्वादीत केल्या बद्दल. |
| २७ मे | : गोंधळाच्या आणि भीतिच्या परिस्थितीत सर्व देशांच्या दैवी संरक्षणा बद्दल. |
| २८ मे | :आमच्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवरील देवाच्या आशीर्वादाच्या वृष्टि बद्दल. |
| २९ मे | :राजकीय आणि धार्मिक विरोधाच्या परिस्थितीत सर्व ख्रिस्ती सेवाकार्यांची वाढ होत असल्या बद्दल. |
| ३० मे | : मिशन क्षेत्रातील सेवकांच्या समर्पितपणा बद्दल. |
| ३१ मे | :सर्व समाजातील स्त्रियांच्या होत असलेल्या उन्नति बद्दल. |
| ०१ जून | : निवासी आणि सायंकाळीन **नहेम्या बायबल कॉलेज** करिता नवीन विद्यार्थी दिल्या बद्दल. |
| ०२ जून | :उत्तम कुशल कारागिरां द्वारे सतत कार्यशील असलेल्या आमच्या मुद्रणालया बद्दल. |
| ०३ जून | :आमच्या ५ मिनिटांच्या यू ट्यूब वरील पहाटेच्या मनन पर संदेश ऐकण्यात वर्गणीदाराच्या आणि साक्षीच्या संख्येत होत असलेल्या वाढी बद्दल. |

## ✝ प्रार्थने करीत ॥ मुद्दे

| | |
|---|---|
| ०४ जून | : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार, महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबावर दया दर्शवावी. |
| ०५ जून | : आमच्या कर्मचारी वर्गाला आणि त्यांच्या कुटुंबाला उत्तम आरोग्य असावे. |
| ०६ जून | : सर्व देशांत ऐक्य असावे, सर्व प्रकारे प्रगती व्हावी आणि नियोजना करिता. |
| ०७ जून | : सर्व ख्रिस्ती संस्थांच्या रक्षणा करिता आणि त्या आशीर्वादीत असाव्या. |
| ०८ जून | : शूभवर्तमान न पोहचलेल्या सर्व ठिकाणी त्याचा प्रसार करणे शक्य होऊ द्यावे याकरिता. |
| ०९ जून | : देवाने त्याच्या राज्याच्या उभारणी करिता आम्हाला अधीक उद्दीष्ट्ये द्यावीत. |
| १० जून | : सर्वत्र पसरणाऱ्या तापापासून आणि नवीन संसर्गजन्य रोगांपासून रक्षण व्हावे. |
| ११ जून | : जगातील तरुण/तरुणींनी आणि लेकरांनी येशू ख्रिस्ताचा त्यांचा वैयक्तिक तारणारा (ऊद्धारक) म्हणून स्विकार करावा. |
| १२ जून | : आमचे वरिष्ठ पाळक, पास्टर एस्. सॅम सेल्वा राज यांना व त्यांच्या कुटुंबियांना उत्तम प्रकृति स्वास्थ्य लाभावे आणि त्यांच्या रक्षणा करिता. |
| १३ जून | : सर्व मार्गांनी आणि प्रमाणांनी सेवाकार्यात वाढ व्हावी. |
| १४ जून | : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकरिता निवासी आणि सायंकालीन **नहेम्या बायबल कॉलेज** करिता योग्य विद्यार्थी मिळावेत. |
| १५ जून | : जगातील सर्व राष्ट्राअध्यक्ष, पंतप्रधान आणि सर्व शासकीय अधिकाऱ्यांकरिता. |
| १६ जून | : २०२३-२४ या शैक्षणीक वर्षाकरिता **सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कूल** मध्ये प्रवेशाकरिता नवीन विद्यार्थी मिळावेत. |
| १७ जून | : आम्हाला आधार देणारे, शुभचिंतक आणि मित्र जे आम्हाला आणि सेवाकार्याला प्रार्थने द्वारे आणि स्वेच्छा दानाद्वारे उचलून धरितात. |
| १८ जून | : आमचे सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियां करिता. |

(पान ४ वरुन)

आहे कि लेकरें देखील त्यांच्या हातातील या यंत्रणामुळे अश्लील चित्र पहाण्याकडे आकर्षिली गेली आहेत.

अंधकाराच्या अधिपतीने वाईट गोष्टींची भर घालून विचारांवर आणि भावनांवर ताबा मिळविला आहे. आपल्याला हे कळत नाही की त्यामुळे आपल्या शांतीचा, कौटुंबीक संबंधांचा, देवा बरोबरील आपल्या संबंधाचा आणि याहूनही अधिक आपले हृदय, मन आणि जीव दुषित करीत आहे. अतिशय महत्वाचे म्हणजे त्याचा आपल्या भावी पीढीवर प्रभाव घडत आहेत. आपल्या प्रत्येक कृतीचा लेकरांवर प्रभाव पडतो.

आपल्या जीवनावर, आपल्या कुटुंबावर, आपल्या मंडळ्यां वर आपल्या सेवा कार्यावर किंवा आपल्या देवा बरोबर चालण्यावर अधिकार गाजवित आहे. आपल्याला दाबून टाकीत आहे. अशा सर्वांतून देव आपणास बाहेर काढो, आपल्यात स्थित्यंतर घडवून आणो.

### ब) ज्ञानाचा अभाव :-

**इफिस ४:१८ या वचनात असे म्हटले आहे, "जे बुद्धिसंबंधाने अंधकारमय झालेले आहे, त्यांच्यांतील अज्ञान व त्यांच्या अंत:करणाचा कठीणपणा यामुळे ते ईश्वरी जीवनाला पारखे झाले आहेत."**

ज्ञानाचा अभाव हा मनाच्या आज्ञाना सारखाच देवाच्या राज्यात गैरसोयीचा आहे. सैतानाची इच्छा असते की आपण अज्ञानी असावे. तो फसविणारा आहे. सैतान ज्ञानाच्या अभाव असलेले असावे यासाठी जोरदार प्रयत्न करतो. मला माहित नाही असे म्हणू नका. (२ करिंथ ४:४) - **"त्याजविषयी या युगाच्या देवाने विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने अंधळी केली आहेत, यासाठी की देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या तेजाचा प्रकाश त्यांवर प्रकाशूं नये.'**

"**मने अंधळी करणे**"

आपण बायबल वाचतो, परंतु काहीवेळा आपल्याला अर्थबोध होत नाही. काही जण जे स्वत:स "चांगले ख्रिस्ती" म्हणविताात, त्यांना देखील आद्याप खोलात अनुभव आलेला नाही. तुमच्या अज्ञानातून देवाने तुम्हाला मुक्त करावे यासाठी त्याला विनंती करा. **"देवाजवळ त्याने शहाणपण मागावे... तो दातृत्वाने देतो."** (याकोब १:५). तंत्रज्ञानाने आपल्या हातात बायबल दिले आहे. बायबल आपल्याला निरनिराळ्या भाषेत आणि आवृत्तित नेहमीच पहावयास उपलब्ध आहे आणि मला त्याबद्दल आनंद वाटतो; परंतु त्याचवेळी आपण मोबाईल मधील बायबलवर अवलंबून रहावयास लागलेलो आहोत. ते आमच्या हातात जरी असले तरी अंत:करणात आणि मनात नाही.

पूर्वी बायबल वचनांचा संदर्भ लोक बायबल चाळून शोधीत होते परंतु ते 'गुगल' या मोबाईल ॲपला विचारतात. मला काळजी वाटते ती अशी की एक असा दिवस येईल की मोबाईल वरील सर्व आवृत्या गायब होतील. तेव्हा आपले काय होणार? सैतानाने आम्हाला या मोबाईल वरील बायबलचा सहज वापर करण्याची सवय लावली आहे; परंतु जेव्हा त्यावर बंदी घालण्यात आल्यानंतर आपली स्थिती कशी होईल. आपल्याकडे देवाचे वचन नसणार. आपले लिखीत स्वरुपातील बायबल अतीशय आवडीने वाचू या आणि पाठांतर करुया, रात्रं-दिवस मनन करुया म्हणजे ती आपल्या अंत:करणात आणि मनात राहतील.

## III कशामधून स्थित्यंतर ?

**प्रकाश - प्रकाश कय आहे?**

### अ) प्रकाश अवलोकन होणे, समजणे आहे

प्रकाश वस्तू-गोष्टि जशा आहेत तशा दाखवितो. "देव प्रकश आहे, त्याच्या ठायी मुळीच अंधकार नाही." यो. १:५ (सुलभ भाषांतर). जेव्हा प्रकाश असतो तेव्हा शक्ति असते. दैवी प्रकाश द्वारे आपल्याला आत्मिक प्रकाश प्राप्त होतो. आपल्या मनाला तो प्रज्वलीत करतो. आपल्याला स्पष्ट दिसण्यास मदत करितो. तो आम्हाला गोष्टी स्पष्ट समजण्यास मोकळीक देतो. प्रकाश **प्रकटीकरण** देतो. बायबल देवा विषयीचे सत्य आहे; ते देवाचा प्रकाश

(...पान ९ वर)


# नहेम्या बायबल सायं कॉलेज
## चेपोक आणि संतोषपूरम, चेन्नई

माध्यम : तमिळ

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र

**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**

**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**

**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**

10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, BELLS ROAD, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.
Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org

## कृपया आमच्या मुख्यालयातील सेवाकार्याकरिता प्रार्थना करा

| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना सेवा | : २४ तास |
| २. | बायबलकोर | : पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम : इंग्रजी, तामिळ आणि हिन्दी |
| ३. | एको ऑफ हिज कॉल | : मासिक : इंग्रजी, तामिळ, मल्यालम, तेलगु, हिन्दी, कन्नड, मराठी, गुजराथी, बंगाली, ओरिया, नेपाळी, आसामी, पंजाबी, उर्दु, सिंहली आणि आफ्रिकन |
| ४. | नहेम्या बायबल कॉलेज (दोन केंद्र) (सायंकालीन / निवासी) | |
| ५. | पत्रव्यवहाराद्वारे थियॉलॉजीकल अभ्यासक्रम : इंग्रजी आणि तामिळ | |
| ६. | महान आजापालनाचे भागीदार (पाळकांचे नेटवर्क) | |
| ७. | प्रशिक्षण कार्यक्रम | |
| ८. | महासभा | |
| ९. | छापील साहित्य वाटप आणि पाठ पुरावा | |
| १०. | शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय : | प्रकाशने |
| ११. | सेंट पॉलस् मॅट्रीक्युलेशन स्कुल | : गावातील इंग्रजी माध्यम हायस्कूल |
| १२. | शब्बाथ शाळा | : सकाळी ८.३० आणि सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| **१३.** | **तामिळ उपासना** | **: सकाळी ८.०० आणि १०,०० वाजता - रविवारी** |
| **१४.** | **हिन्दी उपासना** | **: सायंकाळी ४ वाजता - रविवारी** |
| **१५.** | **तेलगु उपासना** | **: सायंकाळी ५ वाजता - रविवारी** |
| **१६.** | **इंग्रजी आणि तामिळ उपासना** | **: सायंकाळी ६ वाजता - रविवारी** |
| १७. | पाळकांचे समुपदेशन | : सायंकाळी ४ वाजता - रविवारी |
| १८. | स्त्रियांची प्रार्थना | : सायंकाळी ५.३० वाजता - बुधवारी |
| १९. | साप्ताहिक शास्त्राभ्यास | : सायंकाळी ६.३० वाजता - बुधवारी |
| २०. | पुरुषांची प्रार्थना | : सायंकाळी ७ वाजता - शुक्रवारी |
| २१. | शिष्यत्वाची सभा | : सायंकाळी ६ वाजता - शनिवारी |
| २२. | गृह प्रार्थना सभा | : सायंकाळी ६.३० वाजता - मंगळवारी/गुरुवारी |
| २३. | विशेष प्रभु भोजन | : पहाटे ६ वाजता प्रत्येक महिन्याच्या १ल्या दिवशी |
| २४. | सेवाकाची समालोचन सभा | : सायंकाळी ५.३० वाजता - पहिला शनिवार |
| २५. | पालकांची प्रार्थना | : सायंकाळी ४ वाजता - पहिला रविवार |
| २६. | रात्रभर प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - दुसऱ्या शुक्रवार |
| २७. | उपास प्रार्थना | : सकाळी ९.३० वाजता - तिसऱ्या शनिवार |
| २८. | पवित्र सहभागिता | : दुसऱ्या रविवारच्या उपासनेत |
| २९. | Youth / Kid Prayer | : 10.00 p.m. daily |
| ३०. | कार्यालयीन स्टाफचे मनन | : सकाळी ९ वाजता - दररोज |
| ३१. | कार्यालय | : सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत (रविवार वगळून) |

## एको ऑफ हिज कॉल टपाल द्वारे अभ्यासक्रम

### १) बायबलकोर

आम्ही नवीन ख्रिस्ती विश्वासणारे आणि अन्य विश्वासातील लोकांकरिता टपालाद्वारे बायबल मधील पायाभूत सत्यांवर इंग्रजीत ५७ पाने, हिन्दी ७६ पाने आणि तामीळमध्ये ९६ पानांचा अभ्यासक्रम देऊ करीत आहोत. तुम्हाला 'न्यु लाईफ फॉर यू' या शिर्षकाचे अभ्यासक्रमाचे पुस्तक देण्यात येईल! **अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर, तुम्हाला प्रमाणपत्र दिले जाईल. अभ्यासक्रमाकरिता आवश्यक अशी फी आकारली जाणार नाही. तुम्ही आशीर्वादित व्हाल!**

### २) टपालाद्वारे ईश्वर विज्ञान आभ्यासक्रम

हा अभ्यासक्रम सुर्वानिक, ख्रिस्ती पुढारी आणि अरिक्षित सभासद ज्यांना देवाची सेवा करण्याची तीव्र इच्छा आहे, अशा करिता इंग्रजीत ५३७ पानांचा आणि तामिळ भाषेत ६५२ पानांचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. अभ्यासक्रमाची १००० रुपये फी आकारली जाते. त्यामध्ये १४९ अध्याय/पाठ समाविष्ट असलेली एकूण ७ पुस्तके देण्यात येतील. '**सर्टफिकेट इन मिनिस्ट्री**' प्रमाणपत्र देण्यात येईल. देव तुम्हाला आशीर्वाद देईल!

***अधीक माहिती करिता आम्हाला लिहा -***

**अध्यक्ष - नहेम्याह बाईबल कॉलेज**

Echo of His Call, Post Box 2957
CHEPAUK, CHENNAI - 600 005.
Ph.: (044) 2852 8282, 2852 9293, 2854 7766,
Cell : 98410 71852, 95661 31858
E.mail : biblecor@yahoo.co.in

# WANTED

1. Office Staff with Computer Knowledge
2. Security, House Keeping & Cooks

**Echo of His Call,**
Chepauk, Chennai - 05.
Telephone Numbers :
**044 -2852 8282, 2852 9293, 2854 7766, +91 97908 05460**

## कर सवलत

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**ला भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| Account Name | : | ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST |
| Account Number | : | 1023 2923 805 |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Branch | : | TRIPLICANE, CHENNAI - 600 005 |
| IFSC Code | : | SBIN 0000249 |
| SWIFT Code | : | SBI NIN BB 455 |



# खड्ड्यातून महालापर्यंत

# PIT TO PALACE

**“नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !” (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## देवाची कृपा

## GRACE OF GOD!

“तो कंगालांस धुळींतून उठवितो, दरिद्र्यास उकिरड्यावरुन उचलून उभे करितो; म्हणजे मग ते सरदारांच्या शेजारी बसतात आणि वैभवी सिंहासन त्यांस प्राप्त होतें....” (१ शमुवेल २:८)

ती सुंदर - रमणीय सकाळ होती! त्या रविवारच्या सकाळी, माझे आजी-आजोबा, आई-वडील आणि सर्व लेकरें कपडे परिधान करुन नेल्लाराईक्कोनम गावातील ‘चर्च ऑफ साऊथ इंडिया’ ला जाण्याकरिता मोठ्या आनंदाने चालत होते. मी १२ वर्षांचा होतो आणि सर्वांकडे पहात होतो. त्या प्रत्येकांकडे प्रतिष्ठा वाढविणारी योग्यता होती. मला वाटले मजमध्ये नोंद घेण्या लायकीचे काही नव्हते. मी उपासना मंदिरात प्रभु येशू ख्रिस्ताची भक्ति करीत होतो. त्या वेळी माझ्या मनात एक मोठा प्रश्न उद्भवला. प्रभु येशू ख्रिस्त स्वर्गातील त्याची सर्व ‘प्रतिष्ठा’ सोडून या जगात मनुष्य जातीला त्याचे महान नवीन जीवन देण्यास आला. मी माझ्या स्वतःला प्रश्न केला, “तर मग मी माझ्या पाळकांप्रमाणे देवाचा दास कां होऊ नये?” त्या दिवशी मंदिरात असताना प्रभु येशू ख्रिस्त अतिशय स्पष्ट रितीने मजशी बोलला.

त्या पाळकांनी शमुवेल संदेष्ट्या विषयी संदेश दिला. त्यांचा संदेश १ शमुवेल ३ऱ्या अध्यायावर आधारीत होता.

१ शमुवेल ३:१-४ या वचनात आपण वाचतो, “त्या काळी परमेश्वराचे वचन दुर्लभ झाले होते; त्याचे दृष्टांत प्राय: होत नसत. अशा समयात, शमुवेल एलीसमक्ष परमेश्वराची सेवा करीत असे. एके रात्री मंदिरात जेथे परमेश्वराचा कोश होता तेथे झोपला होता. त्यावेळी देवाने शमुवेलाला हाक मारिली. माझे पाळक या घटने बद्दल संदेश देत होते आणि देवाने त्या शमुवेल मुलाला इस्राएलाचा न्यायाधीश आणि महान असा संदेष्टा होण्याकरिता उचलले. हे सत्य जाहिर केले.

ते शब्द माझ्या करिता अतिशय महत्वाचे होते, ते माझ्या जीवना करिता आंसा प्रमाणे किंवा कण्या प्रमाणे झाले.

१) मी माझ्या मंडळीवर आणि लोकांवर प्रेम करु लागलो. मी दर रविवारी प्रार्थना मंदिरात जाण्यास आणि खुर्च्या व बाकांवरील धुळ स्वच्छ करु लागलो. मंदिरा भोवतालचे पटांगण देखील स्वच्छ करण्यास उत्सुक होतो. मी बाजाची पेटी, ड्रम, झांझ त्यांच्या जागेवर ठेवित असे. पुढे, मी ‘गुड न्युज प्रेअर बॅण्ड’ नांवाचा सेवा गट सुरु केला आणि मंडळीला उपासना मंदिराच्या देखभालीत आणि सेवा कार्यात मदत करण्यास सुरुवात केली.

२) मी आमच्या पाळकांना शारिरीक मदत देखील करु लागलो. मी त्यांच्या बॅगा उचलीत होतो, त्यांचे जोडे स्वच्छ करीत असे आणि त्यांच्या करिता माझ्या घरांतून सकाळची न्याहारी, दुपारचे आणि रात्रीचे जेवण नेऊन त्यांना वाढीत असे. अशा रितीने मी पाळकांची आणि इतर देवाच्या सेवकांची सेवा करीत असे.

३) माझ्या मंडळीच्या सभासदांबरोबर चांगल्या रितीने वर्तणूक करीत असे. मी त्या सर्वांकरिता एक चांगला बंधु असा होतो आणि त्यांना सर्व प्रकारे मदत करीत असे.

माझी सेवा करण्याचा चांगला स्वभाव जरी होता, मला बोलण्याची देणगी नव्हती आणि विसरभोळेपणा देखील होता. मी उच्च शिक्षित नव्हतो आणि मला हे ठाऊक होते की माझ्या सर्व मित्रांच्या तुलनेत मला अतिशय कमी कौशल्य आणि कला होत्या.

माझ्या वयाचे माझे मित्र प्रसिद्ध अशा महाविद्यालयांत अभ्यास करण्याकरिता गेले, विशेष शिकवणी वर्गात प्रवेश घेतला, पुष्कळशा भाषा शिकले, कराटे शिकले आणि त्यांचे ज्ञान वाढविण्याकरिता अनेक वेगवेगळा शिक्षण संस्थेत गेले. परंतु देवाने मला त्याच्या मंदिरात मंडळीची आणि देवाच्या सेवकांची सेवा करण्याची कतृत्व देऊ केले.

देवाने शमुवेलाला जसे उचचले तसेच मला अगदि खालच्या पातळीतून वर उचलले. जरी माझा २३ वर्षांचा एक जबाबदार आणि विश्वासू शासकीय नोकर म्हणून कार्यकाळ होता देवाची उपस्थिती सदैव मजबरोबर होती. त्याबद्दलचा हा पुरावा होता - मी शासकीय नोकर असताना देखील मला सेवा करण्याची विशेष परवानगी देण्यात आली होती.

देवाने मला दोन्ही प्रकारच्या कामात परिणामकारक रित्या कार्य करण्यास परवानगी दिली हे मी एक आश्चर्यातील आश्चर्य समजतो!

शमुवेलाचे मंदिरावर प्रेम होते आणि देवाच्या सेवकाची सेवा करणे हा विशेष अधिकार समजला. त्यामुळे देवाने त्याला आत्मिक राज्यात एक मोठा संदेष्टा आणि इस्राएलात महान शास्ता केले.

तुम्ही देखील जर देवाच्या मंडळीचा तुमच्या पाळकांचा मान राखला आणि सेवा केली. तर तुम्ही देखील उच्च स्थळी पोहोचाल.

************

(पान ६ वरुन...)

असे आहे. "**तू आपला प्रकाश व आपले सत्य प्रगट कर; तो मला मार्ग दाखवोत; तुझ्या पवित्र डोंगरावर, तुझ्या निवासस्थानी मला पोंहचवोत.**" (स्तोत्र ४३:३) जर प्रकाश नसेल, तर तेथे सत्य नाही, प्रभात नाही! आपल्याला प्रकाशाची गरज असेल तर आपण डोंगरावर (देवाच्या समक्षतेत) गेले पाहिजे - जेथे देव रहातो. नाहीतर आपण आहोत त्याच ठिकाणी राहू आणि देवाच्या डोंगरावर जाणे अशक्य होईल.

## ब) प्रकाश स्वरुप बदलणारा आहे!

प्रभात समय - म्हणजे येशू ख्रिस्तामध्ये बदल उपलब्ध आहे. प्रकाशाच्या एका झोतानें शौलाला पौल केले. प्रकाश देवाकरिता शुभवर्तमान आहे. ज्याने म्हटले, "**अंधारातून उजेड प्रकाशित होईल असे जो देव बोलला तो, येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या तेजाचें ज्ञान प्रकाशित करावें म्हणून, आमच्या अंत:करणांत प्रकाशला आहे.**" ( २ करिंथ ४:६). प्रकाश देवाचे तेज आहे; जेव्हा ते चमकते ते बदल घडविते. "**परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसून आपण सर्व जण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाडीत आहो आणि प्रभु जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेनें, आपले रुपांतर होत असतां आपण त्याच्याशी समरुप होत आहो.**" ( २ करिंथ ३:१८) देवाच्या वचनातून प्राप्त होणारी माहिती कोणाही मनुष्यात बदल घडवू शकते. शुभवर्तमानाचा उलगडा प्रकाश आणतो. आपण मंडळीमध्ये संदेश कां देत असतो? तो कांही माहिती किंवा बुद्धि ज्ञान नाही. तो आमच्यात बदल घडवितो. ख्रिस्ताप्रमाणे प्रभात येत आहे. चला आपण बदलू या.

मी प्रामाणीकपणे प्रार्थना करीत आहे की, देव येईल आणि आपल्याला प्रभात समयी मदत करील. आपणात बदल येऊ देवू या. प्रभात समयात फार मेठे सामर्थ्य आहे. येशूने प्रभात समयी मृत्यु मोडून टाकला. तो कबरेतून बाहेर आला. प्रभात समयी बाहेर येण्यास प्रकाशाची निवड केली. हे एक सामर्थ्यशाली सत्य आहे.

आपला नवीन करार हा प्रभात समयावर आधारीत आहे. आपल्या पुनरुत्थानाची कहाणी पहाटेच्या समयी घडते. देवाचे प्रत्येक अभिवचन हे प्रभात समयी होय आणि आमेन असे आहे. "**ख्रिस्त उठविला गेला नाही, तर आमची घोषणा व्यर्थ व तुमचा विश्वासही व्यर्थ.**" ( १ करिंथ १५:१४) प्रभात समयात सामर्थ्य आहे. हे वर्ष प्रभात समयाचे - बदलाचे आहे.

शेवटी याकोबाचा विचार करु या.

प्रथमत:, बायबल म्हणते, याकोबाने पहाट होई पर्यंत देवाशी झोंबी केली. त्यानंतर त्याला बदल प्राप्त झाला.

"**याकोब एकटाच मागे राहिला, तेव्हा कोणा पुरुषाने त्याच्याशी पहाट होईपर्यंत झोंबी केली. याकोबावर आपली सरशी होत नाही हे पाहून त्याने त्याच्या जांघेस स्पर्श केला तो याकोब त्याच्याशी झोंबी करीत असता ती उखळली. मग तो म्हणाला, पहाट होत आहे, मला जाऊ दे.**" (उत्पत्ती ३२:२४-२६).

संपूर्ण इस्त्रायलच्या राष्ट्राचा जन्म तेथे झाला. प्रभात समय अतिशय सामर्थ्य झाली आहे. ज्या कशासाठी तुम्ही प्रार्थना करीत आहात, त्याचे उत्तर मिळत नाही तो पर्यंत प्रार्थना करणे सुरु ठेवा; थांबवू नका! याकोब आणि तुम्हाला प्रभात समयी बदल प्राप्त होईल.

दुसरे असे, याकोब घाबरत होता की त्याचा भाऊ त्याजवर हल्ला करील आणि त्यासाठी त्याने एसावाठी शांतर्पणे पाठविली, अशा विचाराने की त्यामुळे त्याचा राग शांत होईल परंतु असे घडले - देवाने कोणतीही समस्या येऊ न देता दोघा भावात समेट होणे शक्य होऊ दिले. तरी देखील देवाने त्याच्या जांघेवर हल्ला केला. त्या झोंबी नंतर, त्याच्या चालण्यात बदल घडला. देवाला आपल्या जीवनात कार्य करु द्या, तो जेव्हा कार्य करतो आपल्या चालण्यात बदल घडेल. आपण पूर्वी सारखे कधीच राहणार नाही. लक्षात ठेवा प्रभाती नंतर एक नवीन राष्ट्राची निर्मीती झाली आणि तुमच्या बदला नंतर हगाम बाहेर येईल!

माझा विश्वास आहे; एक मोठी हालचाल घडणार आहे. एक मोठे स्थलांतर एक असा हंगाम जेथे अंधाराच्या घटकांनी बंदिस्त केलेल्या बद्दल आत्मसंयमन प्रभात समयी कशाची तरी सुरुवात होते. एक नवीन अध्याय, एक बदलाचा नवीन हंगाम. वैयक्तिक, कुटुंब या नात्याने मंडळी आणि राष्ट्र या मध्ये काहीतरी मोडले जाणार आहे. दोन भाग होतील.

परंतु आपण नम्र - मोडले जाण्याची गरज आहे. आपण जो पर्यंत मोडले जात नाही. तो पर्यंत प्रवेश करता येणार नाही. ज्या प्रमाणे कोंबडी अंड्यांना पंखाखाली योग्य वेळी घेऊन बसते, योग्य तापमानात, अंड्यातून पिल्ले बाहेर पडतात. आपल्याला जो पर्यंत मोडणे जाणे समजत नाही तो पर्यंत जन्म देऊ शकत नाही. प्रभात समयी प्रकाश आहे, परंतु प्रकाशाला भेदून पार गेले पाहीजे. एकदा का तो मोडला जातो - एक नवीन सुरुवात, नवीन दार, प्रकाशाचा एक नवीन हंगाम येईल.

आपल्या सर्वाकरीता स्थित्यंतर घडो. कारण देव प्रभात समयी आपल्याला मदत करणार. तुम्हाला हालविले जाणार नाही, देव केंद्रस्थानी असणार. याच आत्मविश्वासाने चला आपण पुढे जऊ या!

देव तुम्हाला अशीर्वाद देवो.

**************

**ST. PAUL'S MATRICULATION SCHOOL,**
**Medavakkam, Chennai - 100. (Christian Management)**

1. **English Teachers** for K.G., Primary, Middle & Secondary School
2. **Hindi Teachers** for Primary & Higher Classes
3. Physical Education Teacher
4. Security & House Keeping Staff

**Free Accommodation available.**

Also Office Staff (with Computer Knowledge) for our Head Office at Chepauk, Chennai – 5.

Apply to : **sam@echoofhiscall.org**
Phone No : **+91 97908 05460, 044-2852 8282**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

## एको ऑफ हिज कोल
### युट्युब

जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा कृपाकरुन आमच्या एको ऑफ हिज कॉल युट्युब चॅनल बघा आणि सबस्क्राईब करा. आभार

**- संपादक**

## OUR BANK DETAILS:

***1. Bank : State Bank of India***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **S. Sam Selva Raj** |
| A/C No. | : | **1023 2934 679** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

***2. Bank : ICICI Bank***

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Anna Salai, Chennai-6** |
| Name | : | **Echo of His Call** |
| A/C No. | : | **6038 0502 2319** |
| IFSC | : | **ICIC 000 6038** |

***3. Bank : State Bank of India***

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

| | | |
|---|---|---|
| Branch | : | **Triplicane, Chennai-5** |
| Name | : | **Echo of His Call Educational Trust** |
| A/C No. | : | **1023 2923 805** |
| IFSC | : | **SBIN 00 00 249** |

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-      आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th MAY 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
P.O. Box No. 2957,
Chepauk, Chennai - 600 005, INDIA.
Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**